# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**पोष्टः शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, प्रकाशने विभाग- २५८८००, २५८८०८,
फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.publication@0sai.org.in
3.publication@sai.org.in

**मुंबई कार्यालय -** साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

# प्रकाशने विभागासाठी पुस्तके छपाई व सी.डी.तयार करून पुरवठा कामाची ई-निविदा.

निविदा किंमत रू.१५,०००/-

**A.** **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे प्रकाशने विभागासाठी पुस्तके व सी.डी.तयार करून पुरवठा करणेबाबत ई-निविदा**

**B.** **ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अद्ययावत प्रेस नोंदणी दाखला, तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन- २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ या ३ आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्रासह ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५ निविदाधारकाची वरील नमुद ३ आर्थिक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू.२ कोटी असणे अनिवार्य राहिल.

६. ई-निविदाधारकाने हार्ड बॉन्ड पुस्तकांची मागील ५ वर्षात किमान रू.१० लाख किंमतीची छपाईकामे केलेल्या कार्यादेशाच्या प्रती Online ई-निविदेसोबत जोडणे अनिवार्य राहिल.

७. कोणत्याही संस्थेत आपले फर्मचे नांव काळया यादीत समावेश केले नसलेबाबत स्वयं प्रमाणपत्र ( Self declaration) सादर करणे अनिवार्य आहे.

**C.** **पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. पुरवठा करावयाचा साहित्याचा तपशिल BOQ मध्ये दिलेला आहे. त्यात ऑनलाईन दर नमूद करून निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.
ज्या निविदाधारकांना निविदा भरावयाची आहे त्यांनी पुस्तके व सी.डी. चे नमुने पाहूनच निविदा भरावी.

२. निविदा फी रक्कम रु.१५,०००/- व बयाणा रक्कम रु.२,००,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

**D.** **निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि.०५/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.१८/०२/२०२० सायं. ५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

३. ई-निविदेसाठी Pre Bid मिटींग दि.१०/०२/२०२० रोजी शिर्डी येथे आयोजित करणेत येईल.

४. शक्य झाल्यास दि.२०/०२/२०२० रोजी Technical Bid उघडण्यात येईल. निविदेसोबत Online सादर केलेली कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यासच Commercial Bid उघडणेत येईल अन्यथा निविदा विचारात घेतली जाणार नाही.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये सादर करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. छपाई करावयाच्या पुस्तकांचा सविस्तर तपशिल (Specification, कागदाचा प्रकार, नग/संख्या वगैरे) BOQ मध्ये नमूद केलेला आहे. निविदाधारकाने सर्वच पर्यायांचा अभ्यास करून BOQ मध्ये दर भरावेत.

७. तयार करावयाच्या सी.डी.चा सविस्तर तपशिलाचा निविदाधारकाने सर्वच पर्यायांचा अभ्यास करून BOQ मध्ये दर भरावेत.

## E. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर, लेबर चार्जेस, पॅकिंग व फॉरवर्डिग खर्च, जकात, वाराई वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार /प्रकाशने विभागामध्ये पोहोच करणेचा वाहतूक खर्च या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्र.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे

## F. छपाई कामाच्या महत्वाच्या सूचना-

१. कार्यादेशाप्रमाणे छपाई व सी.डी.तयार करणेचे काम सुरु केलेनंतर प्रथम प्रुफ १५ दिवसात तयार करुन तो प्रकाशने विभागाकडून तपासून घेऊन व त्याबाबत इकडील लेखी पत्र प्राप्त झालेनंतर पुढील छपाईचे / सी.डी.तयार करणेचे काम सुरु करावे. प्रुफ मान्य करुन न घेतलेली छपाई व सी.डी. स्विकारले जाणार नाही.

२. छपाईचे व सी.डी.चे काम पुर्ण झाल्यावर संस्थानकडून छपाईकामी पुरविण्यात आलेली सी.डी व्यवस्थीत पॅकींग करुन संस्थानला परत करावयाची आहे. त्याशिवाय आपली जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

३. पुस्तके छपाई व सी.डी. तयार करणेपुर्वी ०५ नग डमी (नमुना) पहाणी/ तपासणीकामी इकडील कार्यालयाकडे पाठविणे बंधनकारक राहिल. कार्यालयाकडून नमूना तपासून मान्य केल्यानंतर पुढील छपाई/निर्मिती चालू करावी. आपणास मान्य केलेल्या कागदावरच पहिल्या लॉट पासून शेवटच्या लॉटपर्यंत पुस्तके छपाई करावी लागेल. इतर कोणत्याही कागदावर छपाई करु नये. मान्य केलेल्या कागदाव्यतिरिक्त छपाई केल्यास आपली अनामत रक्कम व देयकाची रक्कम संस्थान खाते जमा (जप्त) करण्यात येईल. तसेच कराराच्या भंगाबाबत कारवाई करण्यात येईल

४. संस्थानकडून पुरविण्यात आलेली सी.डी ही फक्त संस्थानच्या पुस्तक छपाई व सीडी निर्मिती करण्यासाठीच वापरावी, तिचा दुरुपयोग करुन संस्थान व्यतिरिक्त इतर कोणास छपाई केलेली पुस्तके, सी.डी. दिल्याचे आढळल्यास कॉपी राईटस ॲक्ट अंतर्गत तसेच कराराच्या भंगाबाबत कारवाई करण्यात येईल.

## G. साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण-

१. निविदेत नमूद केलेल्या पुस्तकांचा व सी.डी.चा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साई मंदिराचे जवळील प्रकाशने विभागाचे सबस्टोअरमध्ये अगर बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल. प्रसंगी प्रकाशने विभागाचे सूचनेप्रमाणे संस्थान परिसरातील इतर ठिकाणीही पुरवठा करावा लागेल.

## H. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत पुस्तकांचा व सी.डी.चा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर साहित्याचे पुरवठा आदेशाच्या एकुण रकमेच्या ५% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या पुस्तकांचा व सी.डी.चा पुरवठा पूर्ण केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ५% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित डी.डी.व्दारे/रोखीने/आर टी जी एस द्वारे संस्थानच्या बॅंक खात्यावर जमा करावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.६००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.

## I. पुस्तके व सी.डी पुरवठा करण्याचे वेळापत्रक -

१. पुस्तके/ सी.डी.चा पुरवठा सुरू करणेपुर्वी प्रथम प्रुफ (ज्यामध्ये आपणास दिलेल्या Hard & Soft Copy छपाईचा नमुनाबरहुकुम आहे की नाही याची) तपासणी करुन घ्यावयाचा आहे. पुस्तक/ सी.डी.चे अंतिम प्रुफ आपणास तपासून दिलेचे दिनांकापासुन पुढे ०१ महिन्यात पुरवठा सुरु करावयाचा आहे, व ०६ महिन्यांत विनाविलंब विभागाच्या मागणीनुसार छपाईकामाचा पुरवठा पुर्ण करावा लागेल. सदर मुदतीनंतर पुरवठा केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल किंवा विलंब झाल्यास प्रसंगी इतर प्रेसधारकांकडून छपाई करुन घेण्यात येईल. त्यासाठी येणारा जादा खर्च आपले बिलातून अथवा सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

२. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही गरजेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा पुस्तके व सी.डी.ची आयटेमवाईज मागणी संस्थानकडून झाल्यास पुस्तके व सी.डी.चा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

## J. पुस्तके व सी.डी. स्वीकार करण्याची पध्दत-

१. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच पुस्तके व सी.डी.चा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच पुस्तके व सी.डी.चे बिल सादर करावे.

२. ज्या नमुन्याची पुस्तके व सी.डी.च्या निविदा मंजुर होतील ती सर्व मान्य झालेल्या दर्जा व नमुन्याप्रमाणे पुरवावी लागतील. कमी दर्जाचे अगर वेगळया प्रकारची पुस्तके व सी.डी.चा स्विकार केला जाणार नाही. अशाप्रकारची पुस्तके/ सी.डी.चा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठा करीत असलेली पुस्तकांची / सी.डी.ची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample पाहून सदरील साहित्य स्विकारले जाते. तथापि पुस्तके / सी.डी. स्विकारलेनंतरही एखादा लॉट अगर त्यातील काही साहित्य खराब आढळल्यास संपूर्ण लॉट किंवा पुरवठा धारकाशी केलेला करारच रद्द करण्याचे अधिकार संस्थान राखुन ठेवत आहे.

४. पुस्तके/ सी.डी. पुरवितांना पॅकींगचे बॉक्स BOQ मध्ये कळविलेप्रमाणे नगांचे पॅकिंग असावे.

५. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेली पुस्तके/ सी.डी. कमी प्रतीचे आढळल्यास/मान्य दर्जाची नसल्यास कराराच्या अटी/शर्तीचा भंग केल्याची दंडात्मक कारवाई करण्याचा किंवा संपूर्ण करारच रद्द करण्याचा हक्क संस्थान राखुन ठेवत आहे.

६. प्रेसधारकाने प्रत्येकवेळी साहित्याचा पुरवठा करतांना Specification मध्ये कळविलेप्रमाणे कागदाच्या GSM बाबतचा शासकीय / शासनमान्यता प्राप्त प्रयोगशाळेचा पडताळणी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसा माल/साहित्य ताब्यात घेतला जाणार नाही.

## K. लॅब तपासणीची कार्यपध्दती-

१. छपाई कामासाठी निविदेत नमूद केलेला जीएसएमचा कागद वापरलेला नसल्यास किंवा सी.डीचा दर्जा उच्च दर्जाचा नसल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल प्रसंगी करार रद्द करण्याचा अधिकार संस्थान राखुन ठेवत आहे.

२. सी.डी.कामासाठी निविदेत नमुद केलेले मटेरियल वापरावे.

## L. बील आदा करण्याची पध्दती-

१. पुरविलेल्या पुस्तके व सी.डी.चे बिल त्याचा दर्जा व नग संख्या योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठयापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. छपाईकामाचे/ सी.डी.चे देयक सादर करतांना देयकात कार्यादेशातील मजकूराप्रमाणेच तपशिल असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरुपात उल्लेख करु नये, त्यामुळे देयक आदा करणेस विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित पुरवठाधारकांवर राहील.

३. पुस्तकांची/ सी.डी.ची तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या साहित्याचे बील संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

४. निविदाधारकाने पुरविलेली पुस्तके व सी.डी. मान्य दर्जाचे नसल्याच्या कारणावरुन संस्थानने नाकारल्यास संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून सदरील साहित्य खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल. तसेच या कारवाईव्यतिरिक्त दंडात्मक कारवाई केली जाईल, प्रसंगी करार रद्द करण्याचा अधिकार संस्थान राखून ठेवत आहे.

५. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

## M. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-

१. पुरवठा आदेशातील पुस्तके व सी.डी. मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. प्रसंगी करार रद्द करण्याचा अधिकार संस्थान राखून ठेवत आहे.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | मंजूर साहित्यापैकी पुरवठा न केलेल्या शिल्लक साहित्याच्या छपाई किंमतीच्या प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | मंजूर साहित्यापैकी पुरवठा न केलेल्या शिल्लक साहित्याच्या छपाई किंमतीच्या प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. पुस्तके व सी.डी. पुरविणेचा आदेश दिलेनंतर Schedule प्रमाणे पुस्तके व सी.डी.चा पुरवठा न झाल्यास,अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे पुस्तके व सी.डी. नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थान बाजार भावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशाइतके पुस्तके व सी.डी. दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशी खरेदी केलेली पुस्तके व सी.डी. साठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या पुस्तके/ सी.डी.चे बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील. तसेच दंडात्मक कारवाई प्रसंगी करार रद्द करण्याचा अधिकार संस्थान राखून ठेवत आहे.

३. पुरवठादाराने मागणीप्रमाणे मंजुर केलेले दराने व Specification मध्ये नमूद केलेप्रमाणे पुस्तके व सी.डी.चा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठा-धारकास असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने पुस्तके व सी.डी.चा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन पुस्तके व सी.डी.खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच दंडात्मक कारवाई प्रसंगी करार रद्द करण्याचा अधिकार संस्थान राखून ठेवत आहे.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक पुस्तके व पेनड्राईव्हचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

## <u>N निविदा वैधता कालावधी-</u>

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी Technical Bid उघडल्यानंतर १२० दिवसांचा राहील.

## <u>O. सर्व साधारण अटी शर्ती</u>

१. Specification मधील मजकूर पाहून त्याप्रमाणेच साहित्याचे दर भरावेत. Specification मध्ये नमूद केलेल्या मटेरियल/कागदाशिवाय इतर दर देवू नयेत. त्याचा विचार केला जाणार नाही.

२. निविदाकाराने Technical Bid मध्ये दिलेल्या छपाई माहितीसंदर्भात संस्थानचे अधिकारी प्रसंगी आपले उद्योगाचे ठिकाणी भेट देऊ शकतील, त्यावेळी संबधितांना सहकार्य करून आवश्यक ती माहिती देणे बंधनकारक राहील.

३. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

४. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

५. यापुर्वी ज्या निविदाधारकांचे नाव ज्या कालावधीसाठी संस्थानने काळया यादीत (Black List) टाकलेले आहे, अशा निविदा तेवढया कालावधीसाठी विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच ज्यांनी पुरवठा आदेश दिलेनंतर मागणीनुसार/अटी-शर्तीनुसार छपाईचा पुरवठा केलेला नाही, अशा पुरवठादारांच्या निविदा कारवाई केलेपासून ०३ वर्ष विचारात घेतल्या जाणार नाहीत. याकामी मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.स्थानिक उपसिती, मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे उचित कार्यवाही करणेत येईल.

६. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

७. निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

८. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे

९. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

१०. छपाईकामी अग्रीम रक्कम (अॅडव्हांन्स) दिली जाणार नाही.

११. प्रेसधारकांना छपाईकामी मजकुराची सीडी पुरविण्यात येईल. त्यानुसार छपाईचे काम व डिझाईनिंगची सर्व कामे स्वखर्चाने करावयाची आहेत.

१२. सी.डी. तयार करणेकामी मुळ सी.डी. देण्यात येईल. त्यानुसार सी.डी.तयार करावयाच्या आहे.

१३. संस्थानने निविदा काढलेल्या पुस्तके व सी.डी.चे नमुने संस्थानचे प्रकाशने विभागामध्ये उपलब्ध आहेत. निविदाधारकांस रविवार खेरीज कार्यालयीन सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नमूना पाहता येईल. निविदाधारकांनी पुस्तकांचे व सी.डी.चे नमुने पाहुनच दर भरावेत.

१४. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(दी.म.मुगळीकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबतची माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | फर्मचे नांव- | ------------------------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ------------------------------------------------------------ |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------------------ |
| | ऑफीस- | ------------------------------------------------------------ |
| | दुकान- | ------------------------------------------------------------ |
| | निवास- | ------------------------------------------------------------ |
| | मोबाईल नंबर- | ------------------------------------------------------------ |
| | फॅक्स नंबर- | ------------------------------------------------------------ |
| | ई –मेल | ------------------------------------------------------------ |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ------------------------------------------------------------ |
| | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- | -------------------------------------------------------- |
| ५. | मालकाचे/भागीदारांची नावे | १. ------------------------------------------------------------ |
| | | २. ------------------------------------------------------------ |
| ६. | बॅंक खाते नांव | १.------------------------------------------------------------ |
| | शाखा | २. ------------------------------------------------------------ |
| | खाते नंबर व प्रकार | ३.------------------------------------------------------------ |
| | आयएफएससी कोड | ४.------------------------------------------------------------ |

दिनांक :- / /२०२०

ठिकाण :- निविदाधारकाची सही व शिक्का

# निविदाधारकाबाबत तांत्रिक माहिती

१) प्रेसचा / कंपनीचा प्रचलीत भारतीय कायद्यानुसार नोंदणी क्र.

(Registration No.)

२) किती वर्षापासून व्यवसायात आहात ?

३) खाजगी मालकी किंवा कंपनी/ भागीदार ?

(कंपनी/भागीदार असल्यास डीड सोबत जोडावे.)

४) इमारत स्वमालकीची अगर भाडोत्री.

५) इमारतीचे क्षेत्रफळ.

६) उपलब्ध ऑफसेट मशीनरीचा तपशिल

(अ) दोन रंगात छपाई मशीन संख्या.

(ब) चार रंगात छपाई मशीन संख्या.

७) स्वत:ची सीटीपी/डीटीपी यंत्रणा आहे काय ?

८) स्वत:ची फोटो लॅमीनेशनची यंत्रणा आहे काय ?

९) स्वत:ची युव्ही यंत्रणा आहे काय ?

१०) स्वत:ची पुस्तके शिलाई यंत्रणा आहे काय ?

११) किती भाषेत छपाई केली जातेः-

## Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

१. अद्ययावत दुकान/ प्रेस नोंदणी प्रमाणपत्र/दाखला

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. सन २०१६-१७ ,२०१७-१८ व २०१८-१९ या ३ वर्षाचे सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र

५. कोणत्याही संस्थेत काळया यादीत नाव समाविष्ट नसलेबाबत स्वयंप्रमाणपत्र

६. कोणत्याही सरकारी/निमसरकारी संस्थेत मागील ५ वर्षात हार्ड बॉन्ड पुस्तकांची किमान रूपये दहा लाखाची छपाई कामे केलेल्या कार्यादेशाच्या प्रती व पुरवठा चलन (Delivary challan) सोबत जोडणे अनिवार्य आहे.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– सन २०२० करिता प्रकाशने विभागासाठी पुस्तके छपाई व सी.डी. निर्मिती कामाचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या पुस्तके व सी.डी.चा आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाची छपाई संख्या व सी.डी. तयार करणेची संख्या अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेली पुस्तके व सी.डी.संख्येपेक्षा २५% पर्यंत जास्त पुस्तकांची/सी.डी.ची जादा संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही त्या मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या पुस्तकांची/ सी.डी.ची निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर पुरवठा आदेश एकुण रकमेच्या ५% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.६००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे पुस्तके व सी.डी. तयार करून वेळेत शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२०
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव — सही/सहया व शिक्का

(१) -----------------------------------

(२) -----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

# <u>वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र</u>

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------- यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०१६-१७,२०१७-१८ व २०१८-१९ या आर्थिक वर्षाची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं** | **वर्ष** | **वार्षिक उलाढाल** |
|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ | |
| २ | सन २०१७-१८ | |
| ३ | सन २०१८-१९ | |
| | एकूण सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :- / /२०२०
ठिकाण :-

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
( नाव/ सही शिक्का)

नोंदणी क्रमांक.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर , पिन क्र.४२३ १०९.**
**फोन नं.२५८५००/२५८८००/२५८८०८ , फॅक्स क्र.(०२४२३) २५८८७०**
(Website- www.sai.org.in) E-mail- publication@sai.org.in, publication.sssts@gmail.com

---

## ई-निविदा सुचना

श्री साईबाबा संस्थानचे प्रकाशने विभागासाठी पुस्तके व सी.डी.साठी ऑनलाईन ई-निविदा मागविणेत येत आहेत.

- निविदा किंमत रु .१५,०००/- (रू.पंधरा हजार मात्र)
- बयाणा रक्कम रू. २,००,०००/- (रू.दोन लाख मात्र)
- मागील ०३ आर्थिक वर्षात उलाढाल प्रति वर्ष किमान रु.०२ कोटी असावी व छपाई व्यवसायाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक.

१) ई-निविदेच्या अटी व शर्ती शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
२) निविदा ऑनलाईन डाऊनलोड व अपलोडींगसाठी दि.०५/०२/२०२० रोजी सकाळी ११००. वाजेपासुन ते दि.१८/०२/२०२० सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.
३) निविदा फी व बयाणा रक्कम थेट www.mahatenders.gov.in ऑनलाईन जमा करावी.
४) निविदाकाराने सर्व कागदपत्रे ऑनलाईन स्कॅन करुन सादर करावयाचीआहे, Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.
५) पुस्तके व सी.डी.चे नमुने शिर्डी कार्यालयाकडील प्रकाशने विभागात कार्यालयीन वेळेत पहाणेसाठी उपलब्ध आहेत. कृपया नमुने पाहुनच ई -निविदा भराव्यात.
६) शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.२०/०२/२०२० रोजी उघडण्यात येईल.
७) ई-निविदेसाठी Pre Bid सभा दि.१०/०२/२०२० रोजी शिर्डी येथे आयोजित करणेत येईल.
(कोणतीही निविदा अंशतः /पूर्णपणे स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.)

(दी.म.मुगळीकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी